**THE TRAVANCORE OGALE GLASS MFG. CO. LTD.**

# NOTICE

The fourteenth Annual General Meeting of the Shareholders of the Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Wednesday the 12th June 1957, at 4 p. m. to transact the following business:

(1) To read the Notice and Auditors' Report.

(2) To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December, 1956.

(3) To elect a Director in place of Sri. S. Chattanatha Karayalar who retires by rotation and being eligible offers himself for re-election.

(4) To elect a Director in place of Sri. A. P. Tampi who retires by rotation and being eligible offers himself for re-election.

(5) To elect a Director in the vacancy caused by the death of Sri. J. E. A. Pareira.

(6) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

(7) To considered and, if thought fit to pass the following resolution as an Ordinary Resolution:

"That the Books, Registers and other documents required to be maintained by the Company and kept open for inspection under the provisons of the Companies Act 1956, and particularly under Sections 49, 118, 144, 163, 196, 301, 302, 304, 307, 362 & 372 of the said Act, shall be available for inspection at the Registered Office of the Company by the persons entitled thereto to the extent and in the manner and on payment of the requisite fees, if any, specified in aforesaid provisions, between the hours of 10 a. m. and 12 noon on each business day. Provided, however, that the Register required to be maintained under Section 307 of the Act shall be open for inspection of the members or holders of debentures of the Company if any between the times above mentioned only during the period prescribed by sub-section 5 (a) of Section 307."

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday the 3rd to Wednesday the 12th June, 1957, both days inclusive.

*By Order of the Board*
For OGALE BROS. (Private) LTD.
*Managing Agents,*
N. P. OGALE,
*Director*

Alwaye,
April 30, 1957


A member entitled to attend and vote at the meeting is entitled to appoint a proxy who will attend and vote instead of himself when pole is demanded and the proxy need not be a member.

खर्चात बचत करा व पैसा शिलकींत टाका
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
जनता बचत योजना
व्याज : २½ टक्के

शाखा:
फोर्ट, दादर, माहिम,
पुणें, बेळगांव.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: – श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकावू.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. २१ मे, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुंबई राज्यांतील हातमागाचा धंदा

मुंबई राज्यांतील ग्रामोद्योगांत हातमागाचा धंदा हा सर्वांत महत्त्वाचा आहे. राज्यांतील हातमागांची संख्या सुमारें २·४१ लाख असावी असा अंदाज करण्यांत आला आहे. हातमागावर कापड काढण्याचीं ६०० केंद्रें आहेत. ह्या ठिकाणीं संघटितरीत्या कापडाचें उत्पादन करण्यांत येत असतें. हातमागाच्या धंद्याला मदत करून तो वाढीला लावण्यासाठीं राज्य सरकारनें निरनिराळ्या योजना मंजूर केल्या आहेत. ह्या योजनांची सामान्यपणें तीन गटांत वर्गवारी करतां येईल. (१) हातमागाच्या धंद्याची सहकारी संस्थांत संघटना करणें, (२) हातमागावर तयार झालेल्या कापडाच्या विक्रीची व्यवस्था करणें आणि (३) ह्या धंद्याला लागणारीं हत्यारें व इतर साधनें पुरविणें.

आतांपर्यंत विणकरांच्या सहकारी संघटनांना सुमारें ३॥ लाख रुपयांहून अधिक इतकी रक्कम कर्जाऊ देण्यांत आलेली आहे. लायक अशा सहकारी संघटनांना खेळतें भांडवल म्हणून दर हातमागामागें जास्तींत जास्त ३०० रुपये ह्या दरानें कर्ज देण्यांत आलेलें आहे. त्याशिवाय भारत सरकारनें गेल्या मार्च महिन्यांत खेळत्या भांडवलासाठीं म्हणून १७ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. हातमागावर काम करणाऱ्या विणकरांना सुताच्या पुरवठ्याचा प्रश्न नेहमींच सोडवावा लागतो. सुताच्या गिरण्यांकडून जरूर त्या पुरवठ्याची व्यवस्था करण्याची एक योजना अखिल भारतीय हातमाग बोर्ड सध्यां विचारांत घेत आहे. वाजवी भावांत सुताचा पुरवठा व्हावा असा बोर्डाचा हेतु आहे. त्याशिवाय मुंबई सरकारनें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या तीन सुताच्या गिरण्या काढण्यासहि परवानगी दिली आहे. जळगांव, सुरत अगर भडोच आणि इचलकरंजी ह्या ठिकाणीं अशा गिरण्या निघण्याचें घाटत आहे. सौराष्ट्रांत लिंबडी को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल काढण्यांत येणार आहे. ह्या गिरणीचे भाग विकत घेण्यासाठीं मुंबई सरकारनें २ लाख रुपये मंजूर केले आहेत.

नव्यानें पुनर्घटित करण्यांत आलेल्या मुंबई राज्यांत हातमागाच्या सहकारी संस्थांनीं तयार केलेलें कापड विकण्यासाठीं १४७ केंद्रें काढण्यांत आलीं आहेत. शिवाय कापडाची विक्री करण्यासाठीं ४ मोटारगाड्यांचीहि मदत घेण्यांत येत आहे. सुरत आणि जळगांव ह्या ठिकाणीं दोन मध्यवर्ती केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. त्यासाठीं १२,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. हातमागावरील कापड घेणाऱ्या गिऱ्हाइकांना किंमतींत सूट देण्यांत येत असते. १९५६–५७ ह्या आर्थिक वर्षांत ग्राहकांना अशा रीतीनें ३४ लाख रुपये सूट मिळालेली आहे. हातमागांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं विणकरांच्या सहकारी संस्थांना भरपूर मदत दिली जाते विणकरांच्या इतर गरजांकडेहि लक्ष पुरविण्यांत येतें. सोलापूर येथें स्थापन करण्यांत यावयाच्या सहकारी संस्थेंतील विणकरांना रहाण्यासाठीं घरें मिळविण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठीं भारत सरकारनें कर्ज म्हणून २ लाख रुपये आणि मदत म्हणून १ लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्या पैशाचा उपयोग करून विणकरांसाठीं १०० घरांची सोय करण्यांत येईल. भारतांत हातमागांची एकूण संख्या किती आहे तें नक्की करण्यासाठीं भारत सरकारनें हातमागांची सक्तीची नोंदणी करण्याचें ठरविलें आहे. मुंबई राज्यांत ६३,८२८ हातमागांची नोंदणी करण्यांत आलेली असून ६१,७६१ नोंदणी अर्जांची तपासणी चालू आहे.

---

## १८५७ च्या 'बंडा'चें नवें मूल्यमापन

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचें मूल्यमापन भारताच्या राष्ट्रीय वृत्तीच्या इतिहासकारांनीं देशभक्तीनें प्रेरित होऊन केलें. तथापि ब्रिटनमधील शाळकरी विद्यार्थ्याला ह्या युद्धाचा परिचय अजूनहि 'भारताचें बंड' ह्याच शब्दांनीं करून देण्यांत येतो. स्वातंत्र्य प्राप्तीच्या ह्या महान् प्रयत्नाचें मूल्यमापन १०० वर्षांनीं ब्रिटनमध्येंहि करण्यांत आलें. ह्या निमित्तानें 'बंडा'चीं कारणें, त्याचा अर्थ, इत्यादि बाबींसंबंधीं वृत्तपत्रांतून बरेच लेख लिहिण्यांत आले. त्याचप्रमाणें रेडिओवरहि कांहीं भाषणें करण्यांत आलीं. 'बंडां'तील समरप्रसंगासंबंधीं लिहितांना आजपर्यंतच्या ब्रिटिश इतिहासकारांनीं एकच प्रथा पाळलेली आहे. भारतामधील जे सैनिक व योद्धे 'बंड' वाल्यांच्या बाजूनें लढले, त्यांची माहिती देतांना ब्रिटिश ग्रंथकारांनीं आपल्या लेखण्या स्वैर सोडल्या आणि भारतीय सैनिकांना नरपशूंच्या मालिकेला नेऊन बसविलें. ब्रिटिश सैनिकांची मात्र मुक्तकंठानें स्तुति करण्यांत आली. १८५७ च्या शताब्दीनिमित्त ग्रेट ब्रिटनमध्यें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें एक पुस्तक मात्र थोडेसें अपवादात्मक आहे. मेजर जनरल हिल्टन ह्यांनीं लिहिलेल्या ह्या नव्या पुस्तकाचें नांव 'दि इंडिअन म्युटिनी' असेंच आहे. परंतु १८५७ मधील घटनांत भाग घेणाऱ्या उभय पक्षांसंबंधीं त्यांनीं कांहींसें निःपक्षपातानें लिहिलें आहे. ह्या घटनांसंबंधीं लिहितांना ते म्हणतात कीं ब्रिटनच्या अगर भारताच्या नागरिकांनीं शरमून माना खालीं घालाव्या असें त्यामध्यें कांहींहि घडलेलें नाहीं. खरा प्रकार असा आहे कीं, उभयपक्षांच्या वागणुकींत दोष होते. दोन्ही बाजूंच्या सैनिकांनीं अत्याचार केलेले आहेत.

---

**बिहारमधील धान्याची टंचाई**—बिहारमध्यें धान्याच्या टंचाईनें बरेंच उग्र स्वरूप धारण केलें आहे. ही परिस्थिति नाहींशी करण्यासाठीं खास फूड कमिशनर नेमण्याचा विचार चालू आहे. मध्यवर्ती सरकारकडून अन्नधान्य लवकर मिळविणें व त्याच्या वांटपाची योग्य व्यवस्था करणें हीं कामें त्याला करावीं लागतील.

## आगगाड्यांतील उतारूंच्या बेसुमार गर्दीवर उपाय नाहीं

### माल वहातुकीस प्राधान्यः पुरवणी आकारांत वाढ

### रेल्वे-योजनांसाठी आणखी २५० कोटी रु. उभारण्याची आवश्यकता

**१९५७-५८ चें रेल्वे अंदाजपत्रक**

**( आंकडे कोटी रुपयांचे )**

| | पक्के आंकडे १९५५-५६ | सुधारित अंदाज १९५६-५७ | १९५७-५८ चा अंदाज | |
|---|---|---|---|---|
| | | | मार्च १९५७ मधील | आतांचा |
| वाहतुकीपासून होणारें एकूण उत्पन्न | ३१६.२९ | ३५०.०० | ३६८.५० | ३७७.९० |
| चालू खर्च | २१३.२२ | २२९.३४ | २४४.१६ | २४४.१६ |
| इतर किरकोळ खर्च | ७.७३ | ११.०२ | १४.१२ | १४.१२ |
| घसारा निर्धीत जमा | ४५.०० | ४५.०० | ४५.०० | ४५.०० |
| एकूण | २६५.९५ | २८५.३६ | ३०३.२८ | ३०३.२८ |
| खर्चवेंच वजा जातां रेल्वेचा महसूल | ५०.३४ | ६४.६४ | ६५.२२ | ७४.६२ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा करावयाची रक्कम | ३६.१२ | ३७.६९ | ४३.७९ | ४३.७९ |
| निव्वळ शिल्लक | १४.२२ | २६.९५ | २१.४३ | ३०.८३ |

१ जुलै १९५७ पासून माल व पार्सलें यांच्या वाहतुकीवरील पुरवणी आकारांत ६¼ टक्क्यांवरून १२½ टक्क्यांपर्यंत वाढ होईल व सध्यांप्रमाणें कांहीं वस्तू ह्याबाबतींत अपवाद राहतील. ह्या वाढवलेल्या पुरवणी आकारामुळें मालवाहतुकीपासून ११.३ कोटी रुपये व पार्सल वाहतुकीपासून १.२ कोटी रुपये जास्ती उत्पन्न वर्षाकाठीं व्हावें. पण हा आकार १ जुलै पासून वाढविण्यांत येत असल्यामुळें चालू आर्थिक वर्षांत फक्त ९¾ कोटी रुपये प्राप्ति होईल. अर्थमंत्र्यांच्या उतारूंच्या प्रवासाच्या दरांबाबत विचार केला असल्यामुळें ह्या बाबतींत रेल्वे मंत्र्यांनीं स्वतः कांहीं फेरबदल केलेले नाहींत.

रेल्वेना द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत अधिक सुमारें २५० कोटी रुपये लागतील. सध्यांची योजना ११२५ कोटी रुपयांची असून त्यापैकीं ५० कोटी रुपयांची अद्याप वाण आहेच. ही वाण धरून २५० कोटी रुपये उभारणें आहेत.

माल व पार्सल यांच्या वाहतुकींतील उत्पन्नांत होणाऱ्या वाढीमुळें चालू आर्थिक वर्षांत ३०.८३ कोटी रुपयांची शिल्लक रहावी असा अंदाज आहे व ही शिल्लक विकास निधीकडे वळती करण्यांत येईल.

### योजनेंतील तरतूद अगदींच अपुरी

रेल्वेच्या योजनेंत १४८० कोटी रुपयांवरून ११२५ कोटी रुपयांपर्यंत कपात करण्यांत आली. या कमी रकमेशीं जुळेल अशा प्रकारें रेल्वेची योजना आंखडती घ्यावी लागली. लोखंड व पोलाद उत्पादनांत वाढ होण्याच्या दृष्टीनें आवश्यक तेवढे नवे मार्ग टाकावयाचें ठरवून बाकीच्या बहुतेक सर्व नव्या मार्गांच्या योजना रद्द कराव्या लागल्या. तसेंच, रेल्वेना ठरवून दिलेल्या रकमेंत उतारू वाहतुकींत १६.२ कोटी टनांपर्यंत वाढीस तोंड देतां येईल एवढाच विकास करणें शक्य आहे, असें दिसून आलें. यामुळें दुसऱ्या योजनेच्या मुदतींत उतारू गाड्यांतील बेसुमार गर्दी कमी करण्याबाबत परिणामकारक उपाययोजना करण्यावरहि मर्यादा आली.

आगगाड्यांतील गर्दीची परिस्थिति चालू राहण्याची बाब ही तर अनिष्ट खरीच, पण माल वाहतुकीच्या बाबतींतील परिस्थिति देशाच्या विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेचा विचार करतां तर ह्याहूनहि अधिक गंभीर स्वरूपाची म्हणावी लागेल. प्रथम १८.०८ कोटी टन माल वाहतुकीसाठीं तरतूद करण्याचा संकल्प करण्यांत आला होता, पण मागाहून रेल्वेच्या वांट्यास आलेल्या रकमेंत आतां फक्त १६.२ कोटी टन मालाची वाहतूक करणें शक्य आहे. या वाहतुकींपैकीं नव्या वा विकास पावणाऱ्या पोलाद कारखान्यांच्या साधनसामुग्रीच्या वाहतुकीसाठीं ३.५ कोटी टन तसेंच, इतर ग्राहकांसाठीं लागणाऱ्या कोळशांची अधिक ६० लक्ष टनांची वाहतूक, सिमेंटची ४० लक्ष टन जादा वाहतूक इ. गोष्टी विचारांत घेतल्यावर बाकीच्या व्यापारी वाहतुकीसाठीं फारच थोडा वाव उरूं शकेल हें दिसून येईल. आणखी निदान १०० कोटी रुपयांची जादा तरतूद करण्यांत आली तरच १८.०८ कोटी टनांपर्यंत माल वाहतूक करतां येईल.

आतांच्या अंदाजाप्रमाणें पाहतां, तिकिटाच्या व मालवाहतुकीच्या मूळ दरानें रेल्वेची महसुली शिल्लक प्रथम अंजाजिल्यापेक्षा थोडा अधिक राहील आणि ६।। टक्के दरानें बसविण्यांत येणाऱ्या वाढीस पुरवणी आकारामुळें योजना काळांत सुमारें ७१ कोटी रु. जास्त मिळतील. ह्या ६।। टक्के दराच्या पुरवणी आकारामुळें व उल्लेखिलेली ५० कोटी रुपयांची तूट तर भरून निघेलच, पण १९६०-६१ सालपर्यंत वाढणाऱ्या अपेक्षित मालवाहतुकीस तोंड देण्यासाठीं जमा करणें आवश्यक असलेल्या २०० कोटी रुपयांपैकीं कांहीं थोडी रक्कमहि त्यामुळें जमा होईल.

---

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि, अलवाये

वरील कंपनीला १९५६ मध्यें, ६९,२०२ रु. घसारा काढून ३२,१०४ रु. नफा झाला आहे. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता व व्याज हीं करारा-प्रमाणें देण्यांत आलीं आहेत. अहवालाचे वर्षीं विक्रींत आणखी सुधारणा झाली असून मालाला अधिकाधिक मागणी येत आहे.

अहवालाचे वर्षी कंपनीनें विक्रीपासून ९,२३,६८४ रु. मिळविले; गेल्या वर्षीची विक्री ७,१९,१७४ रु. ची होती. गेल्या वर्षीं २४,०४२ रु. तोटा झाला होता व १९५५ अखेर एकूण तोटा ८०,०९२ रु. होता. आतांचा नफा ( ३२,१०४ रु. ) त्यांतून वजा केल्यावर ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस ४७,९८८ रु. नफा-तोटा खात्यांत रहातात.

कंपनीचें देणें कमी झालें असून रोख आणि बँकांतील शिल्लक भरपूर आहे. कमी खेळत्या भांडवलांत कंपनीनें ज्यास्त उत्पादन व विक्री करून आर्थिक परिस्थिति खूपच सुधारली आहे.

**भाताच्या विक्रीसाठी सहकारी संस्था**— आसामच्या अन्न व शेतकी मंत्र्यांनीं भाताच्या विक्रीसाठी शेतकऱ्यांच्या मोठ्या सहकारी संस्था स्थापन करण्याचा विचार चालविला आहे. संस्था स्थापन केल्यामुळ दलालांची गरज रहाणार नाहीं आणि शेतकऱ्यांना वाजवी भाव मिळून भाताच्या किंमतीहि भडकणार नाहींत असा विश्वास त्यांना वाटत आहे.

**मिठाच्या उत्पादनाचा अभ्यास**— भारतांत मिठाच्या उत्पादनाचें कोणतें तंत्र वापरलें जातें त्याची माहिती करून घेण्यासाठीं दहा चिनी तज्ज्ञ भारतांत आले आहेत. भारतामधील मिठागरांचा ते महिनाभर दौरा काढणार आहेत हिमाचल प्रदेशांतील मंडी ह्या ठिकाणच्या खनिज मिठाच्या खाणींना त्यांनीं भेट दिली.

**साखरेची अधिक निर्यात**—भारताचे अन्नमंत्री श्री. अजितप्रसाद जैन ह्यांनीं लोकसभेंत असें सांगितलें कीं भारतामधून अधिकाधिक साखर निर्यात करून जास्ती परदेशीय हुंडणावळ मिळविण्याची सरकारची इच्छा आहे. प्रथम ५०,००० टन साखरेच्या निर्यातीला परवानगी देण्यांत आली. मग आणखी ५०,००० टनाला परवानगी देण्यांत आली.

**भोपाळ शहराचा विकास**—मध्यप्रदेश सरकारनें भोपाळ ह्या राजधानीच्या शहराचा विकास करण्यासाठीं ११ कोटी रुपये खर्च येणारी एक योजना तयार केली आहे. शहरांत अनेक नवीन इमारती सरकारच्या उपयोगासाठीं बांधण्यांत येणार आहेत. त्यांत विधानमंडळाच्या बैठकींसाठा सभागृह व आमदारांना रहाण्याचे वसतिगृह ह्यांचा समावेश आहे.

**दि इचलकरंजी अर्बन को. बँक लि.**

वरील बँकेचा रौप्यमहोत्सव सोमवार, दि. २० मे, १९५७ रोजीं ना. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्याप्रसंगीं बँकेच्या पंचवीस वर्षांची "वाटचाल" या पुस्तिकेचें प्रकाशन अध्यक्षांच्या हस्तें झालें.

**माहितीपट सवलतीनें दाखविणार?**—भारत सरकारच्या बोलपट खात्यानें तयार केलेले माहितीपट व इतर उपयुक्त चित्रपट मोठ्या शहरांतून सवलतीच्या दरानें दाखविण्याचा सरकार विचार करीत आहे. विशेषतः विद्यार्थी, कामगार, फेरीवाले, इत्यादींना ४ आणे घेऊन चित्रपट दाखविले जातील.

**व्हॉइसरायांचे पुतळे**—भारत सरकारनें ब्रिटिश व्हॉसरायांचे पुतळे काढून टाकण्याचा जो निर्णय घेतला आहे त्याला 'मँचेस्टर गार्डिअन' ह्या ब्रिटिश वृत्तपत्रानें पाठिंबा दिला आहे. भारत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांत ठेवण्याची इच्छा असेल तर निष्कारण द्वेषबुद्धि निर्माण करणाऱ्या गोष्टी नाहींशा केल्या पाहिजेत, असें मत त्या पत्रानें व्यक्त केलें आहे.

**जागतिक बँकेचा नकार**—पश्चिम पाकिस्तानांत एक पोलादाचा कारखाना काढण्यासाठी पाकिस्तान सरकारनें जागतिक बँकेकडे कर्ज मागितलें होतें. पण बँकेनें कर्ज देण्याचें नाकारल आहे. संकल्पित कारखाना दिलेलें कर्ज व त्यावरील व्याज परत देऊं शकणार नाहीं अस बँकेचें मत झालें आहे.

**नव्या औषधांचा शोध**—भारतामधील औषधी वनस्पतींचें संशोधन करणारी एक संस्था काश्मिरांत आहे. त्या संशोधन संस्थेनें क्षय व मुदतीचा दोषी ताप ह्यांच्यावर गुणकारी औषधें शोधून काढलीं आहेत. औषधांचे प्राथमिक प्रयोग यशस्वी ठरले आहेत.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

સુખી જીવનની પગદંડી
( ગૃહજીવનનું માંગલ્ય )
લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂ. ૧-૮-૦

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *
( शिड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६१ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे
अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५
खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००
उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज ३॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल. बी. मॅनेजर

## भारतांतील हातमाग धंद्याची गेल्या चार वर्षांतील प्रगति

भारत सरकारला हातमाग धंद्याशीं निगडित असलेल्या प्रश्नां-वर सल्ला देण्यासाठीं आणि विशेषतः या धंद्याच्या विकासाकरितां योजनांची शिफारस करण्याकरितां ऑक्टोबर १९५२ मध्यें अ. भा. हातमाग मंडळाची स्थापना करण्यांत आली. खादी ॲण्ड अदर हॅण्डलूम इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट (ॲडिशनल एक्साइज ड्यूटी ऑन क्लॉथ) ॲक्ट, १९५६ अनुसार उभारण्यांत अलेल्या सेस फंडांतून या मंडळासाठीं आवश्यक त्या पैशाची तरतूद करण्यांत आली.

या धंद्याच्या विकासाकरितां त्याची सहकारी पायावर संघटना करणें आवश्यक आहे ही मंडळाची शिफारस भारत सरकारनें स्वीकारली आणि म्हणून सहकारी पद्धतीवर काम करणाऱ्या मागांसाठीच आर्थिक मदत देण्याचा निर्णय सरकारनें घेतला. भारत सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक साह्यानुसार राज्य सरकारें या धंद्याविषयींच्या योजना कार्यान्वित करतात.

या मंडळाची स्थापना होण्यापूर्वी सदर धंद्यास उतरती कळा लागली होती. परंतु मंडळानें केलेले जोरदार प्रयत्न, भारत सरकारचें आर्थिक साह्य आणि राज्य सरकारांचें या धंद्याच्या विकासाकडे असलेलें लक्ष, यामुळें या परिस्थितींत संपूर्णपणें बदल होऊन तो आतां परत उर्जितावस्थेंत येत आहे. मंडळानें यासाठीं संघटनात्मक, बाजारपेठाविषयक, तांत्रिक योजना आंखल्या आहेत.

### सहकारी पद्धत

ऑक्टोबर १९५३ मध्यें देशांतील एकूण २८,८०,००० मागांपैकीं ६,८२,०८३ माग सहकारी पद्धतीवर चालत होते. परंतु त्यानंतर प्रतिवर्षी हा आंकडा वाढत जाऊन आतां गेल्या ३॥ वर्षांत सहकारी पद्धतीवर ११ लाख माग चालू झाले आहेत.

या धंद्यासाठीं बाजारपेठ वाढविणें हाच मंडळापुढील मुख्य प्रश्न होता. हातमागी कापडाच्या विक्रीवर रिबेट देऊन या मालाचा खप वाढत्या प्रमाणावर करणें शक्य झालें. त्याचप्रमाणें, आपापल्या राज्यांत विक्रीकेंद्रें व फिरत्या गाड्या ठेवण्यासहि राज्य सरकारांना मंडळानें मदत केली. आतांपर्यंत अशीं १,३०० विक्रीकेंद्रें व ३३ फिरत्या गाड्यांची सोय झाली आहे.

हातमागांच्या तांत्रिक स्वरूपांतहि मंडळानें बऱ्याच सुधारणा केल्या. जुन्या ३७,००० थ्रो शटल मागांऐवजीं फ्लाय शटल माग सुरू केले व ४०९ सेमी ऑटोमॅटिक पेडल लूम्स बसविले. त्याचप्रमाणें उत्कृष्ट डिझाइन्सना बक्षिसें, विणकर संस्थांतील विणकरांचें शिक्षण, हातमागी कापडाचें दर्जा नियंत्रण, प्रदर्शनें इ. योजनाद्वारेंहि मंडळानें या धंद्याच्या विकासास हातभार लावला आहे.

याजबरोबर मंडळानें विणकरांसाठीं वसाहती, चालू विणकाम केंद्रांचें नूतनीकरण, सहकारी संस्थांच्या भाग भांडवलांत सरकारचा हातभार व सहकारी कताई गिरण्या इ. योजनाहि हातीं घेतल्या. या धंद्याच्या प्रसिद्धीसाठीं भारत सरकारनें जाहिराती, नीऑन साइन्स, सिनेमा स्लाइड्स, रेल्वे स्टेशनांवर व विमानतळांवर छोटीं दालनें, नियतकालिकांचें प्रकाशन, इत्यादि उपाय योजले.

### बाजारपेठा व विक्रीकेंद्रें

या धंद्याच्या निर्यात व्यापाराकडेहि लक्ष पुरविण्यांत येत आहे. मंडळानें परदेशांतील बाजारपेठेची एक योजना आंखली आहे. कोलंबो, बगदाद, रंगून, सिंगापूर इ. ठिकाणीं हातमागी कापडासाठीं बाजारपेठ कचेऱ्या उघडल्या आहेत. कोलंबो, एडन, सिंगापूर, बँकॉक व कुआलालंपूर येथें विक्रीकेंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. त्याचप्रमाणें, या मालासाठीं अमेरिकेंत मोठी बाजारपेठ मिळविण्यासाठीं सरकारनें त्या देशाच्या कांहीं तज्ज्ञांस भारतांत बोलाविलें होतें. त्यांनीं देशांतील प्रमुख हातमाग केंद्रांचा दौरा करून सरकारला सादर केलेल्या एका सांगोपांग अहवालावर विचार होत आहे.

या धंद्याचा आंतरराज्यीय विकास होण्यासाठीं व ठिकठिकाणीं त्यास बाजारपेठ मिळण्याकरितां ऑल इंडिया हँडलूम फॅब्रिक्स मार्केटिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना करण्यांत आली आहे. या संस्थेची केंद्र कचेरी मुंबईंत असून तेथेंच एक आकर्षक असें विक्रीकेंद्रहि आहे. त्याचप्रमाणें मद्रास शहरींहि एक मोठें विक्रीकेंद्र उघडण्यांत आलें आहे. भारतांत इतरत्र तसेंच परदेशांतील बाजारपेठांतहि या संस्थेच्या कार्याची व्याप्ति वाढणार आहे.

### दुसरी योजना

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हातमाग धंद्यास महत्त्वाची कामगिरी पार पाडावयाची आहे. १९५८-५९ पर्यंत या धंद्याचें उत्पादन ७० कोटी वारांपर्यंत जाण्याची अपेक्षा आहे. १९५५ चें उत्पादन १४७३ दशलक्ष वार होतें तें १९५६ मध्यें १५४१ दशलक्ष वारांवर गेलें. चालू वर्षांत तें किमान २०० दशलक्ष वारांनीं वाढवावयाचें आहे.

सप्टेंबर १९५३ मध्यें सेस-फंड योजना सुरू झाल्यापासून भारत सरकारनें एकूण १७.७ कोटी रु. च्या निरनिराळ्या विकास योजनांस मंजुरी दिली आहे. राज्य सरकारांनीं यांतील सुमारें १५ कोटी रु. खर्च केले असावेत.

१९५६ मध्यें एकूण ५,९७,८६,००० वार कापडाची निर्यात झाली. १९५५ पेक्षा हा आंकडा ४० लाख वारांनीं जास्त आहे. १९५६ च्या निर्यातीची किंमत ८.६६ कोटी रु., तर १९५५ च्या निर्यातीची किंमत ७.७६ कोटी रु. होती. इंग्लंड, अमेरिका सीलोन, मलाया व सुदान या देशांकडे होणाऱ्या निर्यातींत विशेष वाढ झाली आहे.

या धंद्याच्या विकासाचें आणखी एक पाऊल म्हणून भारत सरकारनें मुंबई, मद्रास, दिल्ली, बनारस, सुरत, सारख्या शहरीं डिझाइन सेंटर सुरू करण्याचें ठरविलें असून मुंबईंतील सेंटर सुरू झाला आहे.

मंडळानें याप्रमाणें केलेल्या कामगिरीमुळें भारतांतील हातमागाचा धंदा झपाट्यानें उत्कर्षाचीं पावलें टाकीत आहे.

---

## दि डेक्कन बँक्स असोसिएशन

### नव्या वर्षाचे पदाधिकारी

दि डेक्कन बँक्स असोसिएशन, पुणें, ह्या संस्थेच्या वार्षिक साधारण सभेनें १९५७ सालाकरितां खालीलप्रमाणें कार्यकारी मंडळ निवडलें :—

अध्यक्ष :—श्री. के. पां. जोशी, (चेअरमन, भारत इं. बँक)

उपाध्यक्ष :—श्री. व्ही. जी. हेरेकर, (डायरेक्टर, प्रेसिडेन्सी इं. बँक)

ऑनररी सेक्रेटरी व ट्रेझरर :—श्री. म. व्यं. शिंगरे. (चेअरमन, भोर स्टेट बँक)

ऑनररी असि. सेक्रेटरी :—श्री. रा. बा. साळवेकर, (मॅ. डायरेक्टर, भारत इं. बँक)

इतर सभासद बँका :—(१) बँक ऑफ महाराष्ट्र, (२) बँक ऑफ पूना व (३) बँक ऑफ कराड.

## बाजारभावापेक्षा कमी दरानें विक्री

### इनकमटॅक्सची आकारणी केव्हां करतां येईल ?

**निकटवर्ती संबंध असलेल्या व्यक्तींना सवलतीच्या दरानें केलेल्या विक्रीबद्दल इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांस जादा कर आकारणी करतां येईल काय? या प्रश्नावर मद्रास हायकोर्टानें 'श्री. रामलिंग चूडानिकाई मिल्स लि. विरुद्ध इन्कमटॅक्स कमिशनर' केसमध्यें जो एक निकाल दिला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा असल्यानें खालीं देत आहोंत.**

प्रस्तुत केसमधील कंपनीचा लोकरीचें उत्पादन व विक्रीचा धंदा होता. सदर कंपनीचे जमाखर्चाची तपासणी केल्यानंतर असें आढळून आलें कीं, सदर कंपनीनें केलेल्या एकूण मालाच्या विक्रीपैकी १७,९०,६२४ रुपयांची विक्री ही बाजारभावापेक्षा अतिशय कमी दराची होती. त्यामुळें इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांस या विक्रीबाबत संशय घेऊन या विक्रीबाबतचे स्पष्टीकरणासाठी कंपनीला पाचारण करण्यांत आलें. या मालाची विक्री पुढील तीन लोकांना करण्यांत आली होती. (१) मॅनेजिंग एजन्सी फर्म, (२) त्या कंपनीचा एक डायरेक्टर, (३) त्या कंपनीचा दुसरा एक डायरेक्टर ज्यांत भागीदार होता अशी एक फर्म.

कंपनीनें या वरील तीन लोकांना बाजार-भावापेक्षा अतिशय कमी दरांत माल विकलेला असल्याचें ज्यावेळीं कंपनीच्या निदर्शनास आणून देण्यांत आलें त्यावेळीं कंपनीतर्फे असा खुलासा देण्यांत आला कीं, ही विक्री त्या त्या लोकांशीं पूर्वी करण्यांत आलेल्या तोंडी वायद्याबरहुकूम करण्यांत आली होती व ज्या दिवशीं हे वायदे करण्यांत आले होते त्या दिवशीं त्या मालाच्या बाजारांतील किंमती प्रत्यक्ष विक्रीच्या दिवसाच्या किंमतीपेक्षा बऱ्याच कमी होत्या. परंतु इन्कमटॅक्स अधिकाऱ्यानें हा खुलासा मान्य केला नाहीं व कंपनीनें दाखविलेल्या उत्पन्नांत १,४६,००० रुपयांची भर टाकली. कंपनीनें या तीन लोकांना विकलेल्या मालाची त्या त्या दिवसाची बाजारांतील किंमत व कंपनीनें आपल्या हिशेब बुकांत दाखविलेली त्या मालाच्या विक्रीची किंमत या दोहोंमधील फरक काढून ही १,४६,००० रुपयांची भर टाकण्यांत आली होती. कंपनीचें नुकसान करून या दोन डायरेक्टरांना अधिक सवलतीची वागणूक दिली असा शेराहि आकारणी हुकुमांत नमूद करण्यांत आला होता. ॲपलेट असिस्टंट कमिशनरनें इन्कमटॅक्स ऑफिसरनें दिलेला निर्णय मान्य असल्याचा निर्वाळा दिला व असें नमूद केलें कीं, या व्यवहाराबाबत शेअर होल्डर्सच्या वार्षिक अहवालांत उल्लेख करण्याची कायदेशीर सक्ति जरी डायरेक्टरांवर नसली तरी ती त्यांची नैतिक जबाबदारी होय. यापुढें जाऊन ॲपेलेट ट्रॉयब्यूनलनें तर "ही विक्री अप्रामाणिकपणें करण्यांत आली होती असाच आमचा निष्कर्ष असल्यानें तो माल सवलतीच्या दरानें विकण्याचा अधिकार कंपनीला होता कीं नाहीं हा प्रश्नच उद्भवत नाहीं" असें आपलें मत प्रतिपादिलें. परंतु सरतेशेवटीं मद्रास हायकोर्टानें मात्र कंपनीच्या उत्पन्नांत टाकलेली ही १,४६,००० रुपयांची भर अवास्तव असल्याचा व सदर व्यवहार कंपनीनें अप्रामाणिकपणें केला असें म्हणण्याइतका पुरावा ट्रायब्यूनलकडे नसल्याचा निकाल दिला. सदर निकालपत्रांत मद्रास हायकोर्ट म्हणतें—

"या तीन लोकांनीं केलेली विक्री बनावट असण्याची एक शक्यता होती. म्हणजे असें कीं, तो माल फक्त त्यांना द्यावयाचा परंतु त्यावरील मालकी हक्क मात्र कंपनीकडेच ठेवावयाचा असें आपसांत ठरलें असण्याची देखील शक्यता आहे. असें जर असेल तर त्या कंपनीचा नफा तिला या लोकांकडून मिळालेल्या किंमतीवर न ठरवतां त्या लोकांना तो माल विकून जी किंमत आली असेल त्यावर ठरवावा लागेल. परंतु त्या तीन लोकांचे जमाखर्च तपासल्याशिवाय हें साध्य होणार नाहीं. इन्कमटॅक्स खातें अगर ट्रायब्यूनल यांपैकीं कोणीही हे जमाखर्च तपासलेले नाहींत. जर असा प्रयत्न करण्यांत आला असतां तर कदाचित् त्यांतून वरील गोष्ट सिद्ध होऊं शकली असती. परंतु तशा प्रकारें कसलाहि प्रयत्न न झाल्यामुळें सदर व्यवहारास बनावट व्यवहार म्हणतां येणार नाहीं."

"वास्तविक तो माल बाजारभावानेंच विकून जमाखर्चांत मात्र कमी किंमती दाखविल्याची व बाकीचा पैसा स्वतःच्या खिशांत घातला असण्याची दुसरी शक्यता आहे, हें जर सिद्ध झालें असतें तर कंपनीच्या पैशाचा मॅनेजमेंटनें गैरवापर केला या सदरांत ती केस आली असती. परंतु यासाठीं सुद्धां ह्या तिन्ही लोकांचें जमाखर्च तपासणें अत्यंत आवश्यक होतें. कारण जर खरोखरीच असें घडलें असतें तर त्या तीन लोकांनीं आपल्या जमाखर्चांत दाखविलेल्या रकमा व कंपनीच्या जमाखर्चांत निर्दिष्ट झालेल्या रकमा यांत बरीच तफावत आढळली असती. परंतु या लोकांचे जमाखर्च न पाहिल्यामुळें ही शक्यताहि सिद्ध होऊं शकत नाहीं."

"शेवटीं, स्वतःच्या अथवा आपल्या मित्रांचा फायदा करण्याच्या दृष्टीनें तो माल खरोखरच बाजारभावापेक्षा कमी भावानें विकला असल्याची सुद्धां शक्यता आहे, याला लबाडी म्हणतां येईल. परंतु सवलतीच्या किंमतीच्या रूपांत त्या खरेदीदारांना जो फायदा झाला त्याला कंपनीचा फायदा म्हणतां येणार नाहीं व त्यामुळें त्यावर कर आकारणी होऊं शकणार नाहीं."

अशाप्रकारें आपलें मत व्यक्त करून मद्रास हायकोर्टानें सदर कंपनीचें १,४६,००० रुपयांनीं वाढविलेलें उत्पन्न गैरवाजवी ठरविलें. परंतु केसमधील सत्य काय आहे हें हुडकून काढण्यासाठीं त्या तीन खरेदीदारावरील आकारणी पुन्हां करण्यास मात्र संमति दिली. —'सल्लागार'

---

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

वरील बँकेस १९५६ सालीं, मागील शिलकी नफा (७३६ रु.) धरून आणि ४७,००० रुपये कराची तरतूद करून, ६४,६२७ रु. नफा झाला. त्याची वाटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली :—

| | रु. |
|---|---|
| स्टॅच्युटरी रिझर्व्ह | २४,००० |
| करमाफ ४३% डिव्हिडंड | २९,२५० |
| इनव्हेस्टमेंट घसारा फंड | ३,००० |
| नोकरवर्गास बोनस | ८,००० |
| पुढील वर्षांत ओढण्यासाठी | ३७७ |
| रु. | ६४,६२७ |

बँकेच्या व्यवहारांत अहवालाचे सालीं चांगली प्रगति झाली, हें खालील तुलनात्मक आंकड्यांवरून दिसून येईल :—

| | १९५५ | १९५६ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | २,१०,००० | २,७६,००० |
| ठेवी | ९१,००,००० | १,२१,८३,००० |
| नफा | ५०,१६२ | ६३,८९१ |
| इनव्हेस्टमेंटस् | ४९,७७,७०० | ५३,५१,९०० |
| कर्जे | ४१,४५,००० | ६२,८४,००० |

# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४९५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

(१) ३६१ सदाशिव, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सोलापूर. (४) सांगली.

—ःव्याजाचे दरः—

चालू ठेव–अर्धा टक्का. सेव्हिंग्ज–दोन टक्के.
१२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान् जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,५०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—यथावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलूएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. देवेंद्र आपया मंगाज कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फें | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लक्ष्मी रोड, पुणें शहर.

स्थापना : ४ सप्टेंबर, १९१७

दिनांक १ जानेवारी १९५७ पासून कायम ठेवीचे व्याजाचे दर वाढविले आहेत.

| मुदत | पूर्वीचा दर | नवा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | २ | २½ टक्के |
| २ वर्षे | २½ | २¾ टक्के |
| ३ वर्षे | — | ३ टक्के |
| ५ वर्षे | ३ | ३½ टक्के |
| १० वर्षे | ४ | ४ टक्के |

या बँकेतील ठेवी मुख्यतः सहकारी शेतकी सोसायट्यांना भांडवलाचा पुरवठा करण्यासाठींच वापरल्या जातात.

अधिक माहिती पत्रद्वारें अगर समक्ष आनंदानें पुरवूं.

वा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व आनंद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २९ मे, १९५७ | अंक २२

## विविध माहिती

**मळ्यांतील कामगारांना बोनस**—केरळ राज्यांतील मळ्यावर काम करणाऱ्या २ लाख कामगारांनीं मळ्यांच्या मालकांकडे बोनस मिळण्यासंबंधी मागणी केली होती. मालक व मजूर ह्यांच्यामध्यें बरेच दिवस चाललेला वाद आतां संपला आहे. राज्यांतील चहा व रबर ह्यांच्या मळ्यांतील कामगारांना निरनिराळ्या दरानें बोनस देण्यांत येणार आहे. बोनस १९५५ व १९५६ ह्या सालासंबंधी आहे.

**वाचनालयाला मदत**—पाटणा येथील खुदाबक्ष ओरिएंटल लायब्ररीला भारत सरकारनें दरसाल २५,००० रुपयांची मदत देण्याचें कबूल केलें आहे. हें वाचनालय १८६८ सालीं स्थापन झालेलें असून त्यांत अत्यंत दुर्मिळ अशा प्रकारचे ऐतिहासिक कागदपत्र जपून ठेवण्यांत आले आहेत. वाचनालयांत अरबी भाषेंतील २,७८७ व पर्शिअन २,३५१ भाषेंतील हस्तलिखितें आहेत.

**उत्तर प्रदेशांतील नव्या वसाहती**—पहिल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें पडीक व दलदलीच्या जमिनी रहाण्यास योग्य करण्याचें काम उत्तर प्रदेश सरकारनें हातीं घेतलें होतें. नव्यानें उपलब्ध झालेल्या ह्या जमिनींवर ९,००० कुटुंबांची सोय करण्यांत आली आहे. बहुतेक कुटुंबें निर्वासितांचीं अगर हरिजनांचीं आहेत.

**खादीच्या खरेदींत वाढ**—१९५५–५६ ह्या सालीं भारतामधील रेल्वेनें खरेदी केलेल्या खादीच्या कापडांत पांच पटीनें वाढ झाली आहे. त्या पूर्वीच्या आर्थिक वर्षांत रेल्वेनें ६.९५ लाख रुपयांची खादी घेतली होती. १९५५–५६ सालीं ३४.५ लाख रुपयांची खादी विकत घेण्यांत आली.

**रोज शंभर शस्त्रक्रिया**—बंगलोर येथें डॉ. एन्. सी. मोदी ह्यांनीं गरिबांना डोळ्यांबाबत मोफत सल्ला व औषधें देण्याचें केंद्र सुरू केलें आहे. ह्या हंगामी केंद्रांत डॉ. मोदी शस्त्रक्रियाहि करतात. त्यांनीं एका दिवशीं १०० शस्त्रक्रिया केल्या. तेथेंच गरिबांना चष्मेहि देण्यांत येतात. म्हैसूर सरकारनें ह्या केंद्रासाठीं १,५०० रुपये मंजूर केले आहेत.

**भूदानावर टीका**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं सुरू केलेल्या भूदान चळवळीसंबंधीं लोकसभेंत काँग्रेसच्या एका सभासदानें विरोधी मत व्यक्त केलें. भिक्षा मागून मिळविलेल्या जमिनीच्या आधारावर उभें करण्यांत आलेलें राज्य टिकाऊ असणार नाहीं असें त्यानें सांगितलें.

**आंध्रमधील तांत्रिक शिक्षण**—आंध्र राज्यांतील तांत्रिक शिक्षणाची व्यवस्था पहाण्यासाठी सरकारनें नवें खातें उघडण्याचें ठरविलें आहे. सरकारनें चालविलेलीं एंजिनिअरिंग कॉलेजें, विविध-व्यवसायी तांत्रिक शिक्षणाच्या शाळा आणि तत्सम इतर संस्था खात्याच्या मार्गदर्शनाखालीं काम करतील.

**मतदारांना ओळखपत्रें**—निवडणुकीच्या नियमांत दुरुस्ती करण्यासाठी भारत सरकारकडे मागणी करण्याचें पश्चिम बंगाल सरकारनें ठरविलें आहे. पश्चिम बंगाल सरकारच्या मतानें, प्रत्येक मतदाराला ओळखपत्र देण्यांत यावें आणि त्यावर मतदाराचा फोटो असावा. पश्चिम बंगाल सरकार कलकत्त्यांतील मतदारांच्या याद्या नव्यानें तयार करणार आहे.

**अशोक स्तंभांतील पोलाद**—शास्त्रीय संशोधनाच्या बाबतींत कोणत्याहि आधुनिक सोयी नसतांना सुद्धां २ हजार वर्षांपूर्वी तयार करण्यांत आलेल्या अशोक स्तंभांतील पोलाद उत्कृष्ट असल्याचें मत एका तज्ज्ञानें व्यक्त केलें आहे. त्याच्या मतानें आजहि तसें पोलाद तयार करतां येत नाहीं.

**वैमानिक क्लबांना मदत**—वैमानिक क्लबांना व ग्लाइडिंग संस्थांना मदत करण्यासाठी भारत सरकारनें चालू आर्थिक वर्षांत १५.८५ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. भारतांत सरकारी मदतीनें चालणारे १२ वैमानिक क्लब्स आहेत.

**मळ्यांसंबंधीचा अहवाल**—भारत सरकारनें कॉफी, रबर व चहा ह्या वस्तूंच्या मळ्यांच्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमलें होतें. कमिशनचा अहवाल फार मोठा असल्यामुळें तो छापून प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं. पार्लमेंटच्या सभासदांना मात्र तो दोन महिन्यांत पुरविण्यांत येणार आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## पुस्तकांची १९५५ मधील निर्मिति

खालील तक्त्यांत, ज्या देशांत ४,००० पेक्षां अधिक पुस्तकें प्रसिद्ध झालीं, अशा देशांविषयीं माहिती दिली आहे. चीन व भारत ह्याविषयीं 'युनेस्को' ला माहिती मिळूं शकली नाहीं! वरील तक्त्यामधील १७ देशांत मिळून १९५५ मध्यें १,७५,९३० पुस्तकें प्रसिद्ध झालीं; म्हणजे जगांतील एकूण पुस्तकांपैकी बहुसंख्य पुस्तकें ह्याच देशांत प्रसिद्ध झालीं.

| देश | पुस्तकांची संख्या | त्यापैकी पहिल्या आवृत्त्या |
|---|---|---|
| रशिया | ५४,७३२ | ? |
| जपान | २१,६५३ | १३,०४२ |
| ग्रेटब्रिटन | १९,९६२ | १४,१९२ |
| जर्मन फे. रिपाब्लिक | १५,८३७ | १२,७०१ |
| अमेरिका | १२,५८९ | १०,२२६ |
| फ्रान्स | ११,७९३ | ? |
| इटली | ९,३२० | ? |
| नेदरलंड्स | ७,३५३ | ४,२६० |
| पोलंड | ७,१९९ | ५,८२३ |
| थायलंड | ५,४७५ | ? |
| जर्मन डे. रिपाब्लिक | ५,३५९ | ? |
| युगोस्लाव्हिया | ५,१०५ | ४,६५९ |
| स्पेन | ४,८१२ | ? |
| स्वीडन | ४,७५६ | ३,९१२ |
| पोर्तुगाल | ४,७५४ | ४,४७२ |
| झेकोस्लोव्हाकिया | ४,३९९ | ? |
| बेल्जम | ४,२१२ | ३,७०६ |

### भाषांतर करणारे प्रमुख देश : १९५५ विषयक आंकडे

| देश | किती भाषांतरें? |
|---|---|
| रशिया | ४,२८२ |
| जर्मनी | २,०५६ |
| झेकोस्लोव्हाकिया | १,४७८ |
| फ्रान्स | १,४२४ |
| जपान | १,२०३ |
| इटली | १,११८ |
| नेदरलंड्स | १,१०४ |
| पोलंड | १,०७१ |
| स्वीडन | ९४९ |
| स्पेन | ८९४ |
| अमेरिका | ८१८ |
| युगोस्लाव्हिया | ७३८ |
| ग्रेटब्रिटन | ६५९ |
| रुमानिया | ६५८ |
| नॉर्वे | ६४४ |

### बॉंबे कोऑपरेटिव्ह ट्रिब्यूनलचा कार्यक्रम

बॉंबे कोऑपरेटिव्ह ट्रिब्यूनलचा मुक्काम दि. १५ जून, १९५७ पासून पुणें येथें राहणार असून ट्रिब्यूनलचें कामकाज पुणें येथील सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत चालेल. यावेळीं पुणें व उत्तर सातारा जिल्ह्यांतील अपिलें व अर्ज यांची सुनावणी करण्यांत येईल.

## कोणत्या ग्रंथकारांचीं सर्वांत जास्त भाषांतरें झालीं?

### (१९४८–५५ विषयक आंकडे)

खालील तक्त्यांत ज्यांच्या पुस्तकांची किमान ३०० तरी भाषांतरें झालीं आहेत, अशांची यादी दिली आहे. त्यांत पर्ल बकचें नांव आहे. ग्रंथकारांपैकी ज्यांचीं १०० पेक्षां अधिक भाषांतरें झालीं आहेत, अशांपैकीं जिवंत असलेली ती एकटीच ग्रंथकार आहे आणि स्त्री-ग्रंथकारांत अग्रेसर आहे.

| ग्रंथकार | देश | भाषांतरांची संख्या | फक्त १९५५ | |
|---|---|---|---|---|
| | | | भाषांतरांची संख्या | देशांची संख्या |
| लेनिन | रशिया | ९६८ | ३७१ | १४ |
| बायबल | | ८८७ | ९९ | ११ |
| स्टॅलिन | रशिया | ६८९ | २०० | १२ |
| टॉलस्टॉय | रशिया | ४९५ | १०५ | २३ |
| एम. गॉर्की | रशिया | ४८९ | १०२ | १९ |
| डिकन्स | ग्रेटब्रिटन | ४४३ | ५४ | १८ |
| व्हर्ने | फ्रान्स | ४३२ | ९२ | १६ |
| शेक्सपिअर | ग्रेटब्रिटन | ४२४ | ७४ | २२ |
| बालझॅक | फ्रान्स | ४२४ | ५० | १९ |
| कार्ल मार्क्स | जर्मनी | ४१५ | ६१ | १२ |
| एंजल्स | जर्मनी | ४०९ | ६४ | १४ |
| अँडरसन | डेन्मार्क | ३६६ | ७१ | २२ |
| डॉस्टिव्हस्की | रशिया | ३५८ | ६२ | १८ |
| जे. लंडन | अमेरिका | ३४७ | ५५ | १९ |
| आ.एल.स्टीव्हनसन | ग्रे. ब्रिटन | ३०७ | ३५ | १३ |
| चेखॉव | रशिया | ३०५ | ६६ | १९ |
| पर्ल बक | अमेरिका | ३०४ | ३२ | १७ |
| ट्वेन | अमेरिका | ३०३ | ५२ | १६ |

१९४८–५५ ह्या मुदतींत ज्यांचीं १०० पेक्षां अधिक भाषांतरें झालीं, अशा ग्रंथकारांची संख्याहि १०० पेक्षां अधिक आहे. खुद्द रशियांतच पुष्कळ भाषा असल्यानें, रशियन ग्रंथकारांच्या भाषांतरांची संख्या जास्त मोठी आढळते. कित्येक वर्षें, भाषांतर होणाऱ्या ग्रंथांत बायबलचें अग्रस्थान असे; १९५५ मध्यें बायबलचा अनुक्रम दुसरा गेला आहे; लेनिननें पहिली जागा पटकाविली आहे. १९५५ मध्यें लेनिनच्या ३७१ भाषांतरांपैकी फक्त ४३ रशियाच्या बाहेर प्रसिद्ध केलीं गेलीं; बाकी सर्व म्हणजे ३२८ रशियांतच, रशियन वगळून बाकीच्या भाषांतून, प्रसिद्ध झालीं.

**दक्षिण भारतांत पोलादाचा कारखाना**—दक्षिण भारतांत दरसाल १० लाख टन पोलाद उत्पन्न करणारा कारखाना काढण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. कारखान्यासाठीं जळण म्हणून कमी प्रतीचा कोळसा वापरण्यांत येणार आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील पोलादाचा हा सर्वांत मोठा कारखाना होईल. बोकॅरो येथेंहि १५ लाख टनाचा पोलादाचा कारखाना काढण्यांत येणार आहे.

**विनातिकिट प्रवास करणारे**—१९५६ सालीं दक्षिण रेल्वे मार्गावर ९,४३,००० लोकांना तिकिट न घेतां प्रवास करतांना पकडण्यांत आलें. त्यांपैकी ८,८८,००० प्रवाशांनीं पकडल्यानंतर दंडाची रक्कम भरली. एका कारकुनाला ह्या कारणासाठी पकडण्यांत आलें असतां आज कित्येक वर्षें आपण असाच प्रवास करीत असल्याची कबुली त्यानें दिली.

**अर्थ**

बुधवार, ता. २९ मे, १९५७

संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे



### व्यापारी भारताबद्दल विश्वास

भारताला परदेशीय हुंडणावळीची अतिशय गरज असल्यामुळें शिलकी हुंडणावळ काटकसरीनें वापरण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. त्यामुळें कांहीं देशांत भारताच्या आर्थिक स्थैर्याबद्दल साशंकता निर्माण होणें शक्य आहे. पण निदान पश्चिम जर्मनीच्या परराष्ट्रीय सरकारला तरी भारताच्या शहाजोगपणाबद्दल कांहींहि शंका वाटत नाहीं. पश्चिम जर्मनीच्या कचेरींतील व्यापार खात्याचे प्रमुख ऑटो एबरल ह्यांनीं भाषण करतांना नुकतेंच असें सांगितलें कीं चालू वर्षाच्या आरंभीं परदेशीय हुंडणावळीची जपणूक करण्यासाठीं भारत सरकारनें कांहीं उपाय योजले. ह्या उपायामुळें पश्चिम जर्मनीचा भारतावरील विश्वास मुळींच कमी झालेला नाहीं. भारत सरकार व भारतामधील व्यापारी ह्यांनीं पश्चिम जर्मनींत अनेक मागण्या नोंदविल्या आहेत. त्यांनीं आपल्यासंबंधीं खूपच विश्वास निर्माण केलेला आहे. भारत सरकारनें आपला कारभार आत्मविश्वासानें व स्थिरवृत्तीनें चालविलेला आहे. शिवाय, मागील अनुभव जमेस धरतां भारत हा आपले व्यापारी देणें देण्याच्या बाबतींत आदर्श ऋणको ठरलेला आहे. भारत सरकारनें उभयतां देशांतील व्यापारी घेणें-देणें मिटविण्यासाठीं जे उपाय सुचविले आहेत ते बरेच लवचिक आहेत. ते केवळ तात्त्विक स्वरूपाचे नाहींत. भारत सरकारप्रमाणेंच पश्चिम जर्मनीहि शक्याशक्यतेचा विचार करून योग्य त्या मार्गाचा अवलंब करील. प्रत्येक व्यापारी सौद्याचा स्वतंत्रपणें विचार करणें त्यामुळें शक्य होईल.

---

### ही निर्यात चालू देणें इष्ट आहे काय ?

दक्षिण आशिआंतील देशांत भारत हा देश तुलनात्मक दृष्टीनें बराच पुढारलेला आहे. त्यामुळें गेल्या कांहीं वर्षांत औद्योगिक क्षेत्रांत भारताकडून इतर मागासलेल्या देशांना थोडीबहुत मदत करण्यांत आली. औद्योगिक क्षेत्राप्रमाणेंच इतर बाबींतहि भारताकडून मदत मिळविण्याचे प्रयत्न होत असतात. मलायाच्या सरकारनें भारतामधून १०० डॉक्टर्स मिळविण्यासाठीं वृत्तपत्रांतून जाहिराती दिल्या होत्या. ह्या जागांसाठीं १,००० डॉक्टर्सकडून अर्ज गेले होते असें समजतें. ही घटना अनेक दृष्टींनें चिंतनीय अशीच आहे. खुद्द भारतांतच डॉक्टर्ससारख्या कुशल व्यावसायिकांची, लोकसंख्येचा विचार करतां, वाण आहे असें नेहमीं सांगण्यांत येतें. डॉक्टरमंडळी शहरांतूनच दाटी करून राहतात; खेडेगांवीं जाण्यास तयार होत नाहींत असा आरोपहि त्यांच्यावर केला जातो. ह्याचा अर्थ असा कीं ज्या ठिकाणीं त्यांची जरूरी आहे त्या ठिकाणीं जाण्यास ते तयार नसतात. म्हणजे मुळांतच तुटवडा असणाऱ्या ह्या महत्त्वाच्या व्यावसायिकांची टंचाई अधिकच तीव्र होते. अशा परिस्थितींत डॉक्टर्स लोकांना परदेशांत जाण्यास परवानगी देणें कितपत योग्य ठरेल असा प्रश्न उद्भवतो. मेडिकल कॉलेजमधून हजारों रुपये खर्चून शिक्षण घेतल्यावर ह्या मंडळींच्या ज्ञानाचा उपयोग देशाला होऊं शकूं नये ही परिस्थिति चिंताजनक आहे. पंचवार्षिक योजना पार पाडण्यासाठीं तांत्रिक कामें करणाऱ्या कुशल व्यावसायिकांची जंत्री तयार करण्यांत येते. तंत्रज्ञांच्या यादींत केवळ एंजिनिअर्स अगर तत्सम लोक असावेत असें नाहीं; डॉक्टर्सहि तंत्रज्ञच आहेत.

---

### केरळ राज्यांतील काथ्याचा धंदा

केरळ राज्यांत काथ्या तयार करण्याचा व त्यापासून नानाप्रकारच्या उपयोगी वस्तू बनविण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. ह्या धंद्यांत सुमारें १० लाख लोकांना रोजगार मिळतो ह्यावरून त्याच्या महत्त्वाची कल्पना येण्यासारखी आहे. तथापि गेल्या कांहीं वर्षांत धंद्याची परिस्थिति अडचणींची झालेली आहे. पूर्वीच्या त्रावणकोर-कोचीनच्या सरकारनें अडचणींचें निवारण करण्यासाठीं सहकारी संस्था स्थापन केल्या होत्या. पण त्यांचे प्रयत्न व्हावे तितके यशस्वी झाले नाहींत. केरळच्या नव्या सरकारनें आतां ह्या धंद्याकडे लक्ष द्यावयास प्रारंभ केला आहे. धंद्याचा विकास करण्यासाठीं व अडचणी नाहींशा करण्यासाठीं राज्य सरकारनें संबंधितांची एक परिषद् भरविली होती. परिषदेला २०० प्रतिनिधी हजर राहिले होते. परिषदेंत भाषण करतांना राज्याचे उद्योगमंत्री श्री. के. पी. गोपालन् म्हणाले कीं ह्या धंद्याची उभारणी मजबूत पायावर करून त्यामधील कामगारांना किमान वेतनाची शाश्वति देण्यांत आली, तरच त्याची भरभराट होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या धंद्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें ५३·५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. राज्य सरकारनें ह्या कामासाठीं १५० लाख रुपयांची मागणी केली आहे. ह्या धंद्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. परदेशी हुंडणावळ मिळविण्याच्या दृष्टीनेंहि तो महत्त्वाचा आहे. १९५६–५७ सालांत ८१,००० टन काथ्या अगर त्यापासून तयार केलेला माल भारतामधील बंदरांतून निर्यात करण्यांत आला. त्याची किंमत ९३० लाख रुपये भरली. त्यापैकीं ६५,००० टन वजनाचा व ७४६ लाख रुपये किंमतीचा माल कोचीन बंदरांतून रवाना झाला.

---

### इनकमटॅक्स देणारांची वर्गवारी

५ लक्ष रुपयांचे पेक्षा ज्यास्त वार्षिक उत्पन्नावर ज्यांची करआकारणी होते, अशांची संख्या भारतांत १२७ आहे. १ लक्ष रुपयांपेक्षा अधिक प्राप्तीचे लोक २,१३९ आहेत. एकूण ५,००,००० लोक इनकमटॅक्स भरतात. व्यापारी व व्यवसायी लोकांकडून एकूण १८० कोटी रुपये करापैकीं १३८ कोटी रुपये मिळतात. कर भरणाऱ्यांपैकीं ७५% लोकांची वार्षिक प्राप्ति १०,००० रु. पेक्षा कमी असते व ते एकूण कराच्या फक्त ४% कर देतात. पगारदार लोकांचेकडून १३% कर मिळतो.

---

### मध्यवर्ती सरकारचीं राज्यांना कर्जें

मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारांना व्याजानें दिलेल्या कर्जांची येणें रक्कम १०३० कोटी रु. आहे.

## व्यापाऱ्यांनीं आपल्या नफ्यांतून करवाढ भागविली तर महागाई होणार नाहीं !

### सरकारचा अजब युक्तिवाद

इ. स. १९५७–५८ च्या अर्थसंकल्पांत निरनिराळ्या वस्तूंवरील करांत वाढ करण्यांत आली असल्यामुळें जनतेच्या दैनंदिन खर्चांत कितपत वाढ होईल तें कांहीं वस्तूंवरील करांचीं उदाहरणें घेऊन पुढें मांडण्यांत आलें आहे.

चहावरील कर प्रत्येक पौंडामागें २० नया पैशांनीं व कॉफीवरील कर प्रत्येक पौंडामागें १६·२५ न. पै. नीं वाढविण्यांत आला आहे. ही वाढ जमेस धरून साखरेच्या खर्चासुद्धां, चहाच्या किंवा कॉफीच्या दर कपामागें फक्त १/३ किंवा १/२ नया पैशाचा खर्च वाढेल. असें असल्यामुळें तुम्ही ज्या ठिकाणीं चहा कॉफी पितां तो दुकानदार जर अगदींच नाममात्र फायद्यावर आतांपर्यंत धंदा चालवीत नसेल, तर त्यानें चहाच्या कपाचा दर वाढविण्याचें मुळींच कारण नाहीं.

**काड्या पेट्या :**—४० काड्यांच्या पेट्यांवरील जकात ९/१० न. पै. नें व ६० काड्यांच्या पेटीवरील १½ न. पै. नें वाढविण्यांत आली आहे. तेव्हां कारखानदारानें व व्यापाऱ्यानें रास्त तो फायदा घेऊनहि ह्या पेट्या किरकोळीनें पुढीलप्रमाणें विकतां येतील :—४० काड्यांच्या पेटीस ४ न. पै. व ६० काड्यांच्या पेटीस ६ न. पै.

**साखर :**—साखरेवरील कर पौंडामागें ५ न. पै. नें किंवा शेरामागें १० न. पै. नें वाढविण्यांत आला आहे. अर्थात् किरकोळ किंमतींत ह्याहून अधिक वाढ होण्याचें कांहींच कारण नाहीं. परंतु पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक असल्यामुळें तुम्ही थोडी कमी साखर घेतल्यास बरें.

**कागद :**—साध्या लेखनाच्या कागदावरील कर दर पौंडास फक्त १½ न. पै. एवढा वाढविण्यांत आला आहे. अर्थात् त्याच्या किंमतींतहि वाढ झालीच तर ती ह्याहून अधिक होऊं नये.

**वनस्पतिजन्य तेलें :**—या तेलांवरील कर दर पौंडामागें फक्त २ न. पै. एवढा वाढविण्यांत आला आहे. परंतु खेड्यांतील किंवा लहानशा शहरांतील घाणींच्या तेलावर किंवा वार्षिक उत्पादन ७५ टनांहून अधिक नसतें अशा उत्पादकांनीं गाळलेल्या तेलावर कर आकारण्यांत येत नाहीं. अर्थात् नवीन जकातवाढीचा परिणाम त्यांच्या तेलावर होण्याचें कांहींच कारण नाहीं.

शहरी भागांत वनस्पतिजन्य तेलाच्या किंमती पौंडामागें ७० न. पै. वरून ९० न. पै. पर्यंत वाढल्या आहेत. म्हणजे आतांहि धंदेवाले व व्यापारी हे पुरेसा नफा मिळवीत आहेतच. तेव्हां त्यांनीं ही २ न. पै. एवढी करवाढ आपल्या नफ्यांतून देण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं.

---

**नवीन प्रकारचा रेल्वेचा डबा**—फ्रेंच रेल्वेनें नवीन प्रकारचा रेल्वेचा प्रवासी डबा बनविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. गाडी वळणावर जोरानें धावत असतांना प्रवाशांचा तोल जातो, तो न जाण्यासाठी डब्यांच्या भागांची कांहीं विशेष प्रकारची रचना करण्यांत येत आहे.

**बिहारमध्यें 'थोरिअम' चा सांठा**— अणुशक्तीच्या उत्पादनासाठी जरूर असलेलें 'थोरिअम' हें खनिज व इतर अशाच प्रकारचीं खनिजें पूर्व बिहारमध्यें सांपडलीं असल्याचें लोकसभेंत सांगण्यांत आलें. भारताच्या अणुशक्तीमंडळानें केलेल्या भूस्तरविषयक पहाणींत हा शोध लागला.

## कापड धंद्यांत एप्रिल, १९५८ पासून दशांश पद्धत

### किलोग्रॅम व मीटर ह्यांचा उपयोग

पुढील वर्षाच्या एप्रिलपासून भारतांतील कापड धंदा खरेदी-विक्रीच्या बाबतींत दशांश पद्धतीचा वापर करूं लागेल. टेक्स्टाइल कमिशनर श्री. व्ही. नंजप्पा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई येथें २० मे रोजीं भरलेल्या बैठकींत हा निर्णय घेण्यांत आला. गिरणी मालक संघटनांचे, व कापड गिरणी यंत्रसामुग्री कारखानदारांचे प्रतिनिधि बैठकीस उपस्थित होते. घाऊक व्यवहारांत कपाशीची खरेदी किलोग्रॅममध्यें होईल व कापडाची विक्री मीटरमध्यें होईल. किरकोळ विक्रींत हें मापन मागाहून हळूहळू वापरण्यांत येईल. दरम्यान कापडावरील शिक्के वारांत व मीटरमध्यें, दोन्हींत, मारण्यांत येतील. संक्रमणात्मक काळांत भासणाऱ्या अडचणींसंबंधीं विचार करण्यासाठीं एका तांत्रिक समितीची नेमणूक करण्यांत आली आहे. दोन महिन्यांत ही समिति आपला अहवाल सादर करील. धंदेवाल्यांनीं हा बदल करण्याची तयारी दर्शविली, परंतु या बाबतींत प्रसिद्धीचा व लोकशिक्षणाचा कार्यक्रम आंखणें जरूर असल्याचें ते म्हणाले.

---

### मुंबईसाठी भुयारी रेल्वेची तयारी

मुंबई शहराची रेल्वे-वहातुकीच्या व्यवस्था अपुऱ्या पडत असल्याचें प्रसिद्धच आहे. जमिनीवरून चालणारी रेल्वेची वहातूक अपुरी पडत असल्यानें भुयारी रेल्वे बांधण्याचा विचार करण्यांत येत आहे. मुंबईचें कॉर्पोरेशन व बेस्ट कंपनी ह्यांनीं ह्या कामासाठीं एका जपानी कंपनीचें टेंडर गेल्या मार्च महिन्यांत मंजूर केलें होतें. ह्या कंपनीला कन्सल्टिंग एंजिनिअर्स म्हणून नेमण्यांत आलें होतें. कंपनीच्या एंजिनिअर्सनीं कामाची प्राथमिक तपासणी पुरी केली असून सुमारें तीन महिन्यांच्या अवधींत ते आपला अहवाल सादर करणार आहेत. टोकिओ व ओसाका ह्या जपानमधील शहरांच्या भुयारी रेल्वेचे सल्लागार म्हणून ही कंपनी काम करते. कंपनीच्या मतानें वरील दोन्ही शहरांपेक्षा मुंबईची जमीन भुयारी रेल्वेच्या बांधणीला अधिक अनुकूल आहे. त्यामुळें एकूण योजनेच्या खर्चांत बचत होण्याचा संभव आहे. भुयारी रेल्वे दुहेरी रुळाची करण्याचें ठरलें तर तिच्या प्रत्येक मैलागणिक ३ कोटी रुपये खर्च करावे लागतील. त्यांपैकी दोन कोटी रुपये मामुली बांधकामावर खर्च होतील आणि १ कोटी रुपये एंजिनें, डबे व इतर यांत्रिक साहित्य ह्यावर खर्च करावे लागतील. जपानी तज्ज्ञांनीं मुंबईतील वहातुकीचे आंकडे बेस्ट कंपनी आणि मध्य व पश्चिम रेल्वे ह्यांच्याकडून मिळविले आहेत; वहातुकीसंबंधी त्यांनीं जमा केलेल्या माहितीवरून त्यांचें असें मत झालें आहे कीं अशी रेल्वे बांधण्यास पुरेशी वहातूक मुंबई शहरांत आहे.

---

**हौशी प्रवाशांचा विरस**—काश्मीरला गेलेल्या बऱ्याच हौशी प्रवाशांचा विरस झाला. काश्मीरच्या खोऱ्यांत बर्फवृष्टि व पाऊस ह्यांचा धुमाकूळ चालू असल्यानें गेल्या आठवड्यांत जम्मु येथें १,००० प्रवासी अडकून पडले आहेत. प्रवाशांच्या गर्दीमुळें जम्मूमधील खाजगी हॉटेल्स भरून गेलीं आहेत. सरकारी इमारतींतूनहि त्यांना आश्रय देण्यांत येत आहे.

**आंध्रमधील कागदाचा कारखाना**—आंध्रमध्यें वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार चालू आहे. आजच्या अंदाजाप्रमाणें कारखान्यासाठी ५·५ कोटी रुपये लागतील. कारखान्यांत दरसाल ३०,००० टन कागद तयार होईल.

## स्टेट बँकेच्या सालेम शाखेंतून हरवलेले १·६ लक्ष रुपये

स्टेट बँकेच्या सालेम शाखेमध्यें, रिझर्व्ह बँकेकडे पाठविण्यासाठीं १·८३ लक्ष रुपयांच्या नोटा बांधल्यानंतर उरलेली शिल्लक २२ एप्रिल, १९५७ रोजीं तपासली, तेव्हां १० रुपये वाल्या नोटांच्या बंडलाची १·६ लक्ष रुपये तूट आढळून आली. रिझर्व्ह बँकेकडे नोटा प्रत्यक्ष पाठविण्याचें थांबवून पुनः तपासणी केली, तरी नोटा सांपडल्या नाहींत. म्हणून, पोलिसांकडे तक्रार नोंदविण्यांत आली आणि पोलिस खात्यानें चौकशीस प्रारंभ केला. १६ एप्रिल रोजीं, बँकेच्या स्ट्रॉंग रूममधून बँकिंग हॉलमध्यें गोदरेजचें कपाट हालविण्यांत आलें होतें, तें बँकेच्या एजंटानें मद्रासच्या करन्सी ऑफिसांतून आलेल्या नव्या नोटा ठेवण्यासाठीं पुनः स्ट्रॉंग रूममध्यें नेण्यास ३० एप्रिल रोजीं सांगितलें. हें कपाट उघडलें, तेव्हां एजंटाला कपाटाच्या खालच्या कप्प्यांत नोटांचें बंडल जसेंच्या तसें सांपडलें.

एका पोलिस इन्स्पेक्टरानें केलेल्या चौकशीवरून स्टेट बँकेचें असें मत झालें कीं, कॅश ज्यांच्या ताब्यांत होती त्यांच्या (अकौंटंट व हेड कॅशिअर) दुर्लक्षामुळें नोटा हरविण्याचा प्रकार घडून आला; त्यांनीं कपाट हलविण्यापूर्वीं तें नीट तपासलें नाहीं. त्यांचेवर शिस्तभंगाबद्दल करावयाच्या इलाजाविषयीं स्टेट बँकेचें मद्रास लोकल बोर्ड विचार करीत आहे.

ही सर्व माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

---

## नवीं प्लॅन सेव्हिंग्ज सर्टीफिकिटें

### १०० रु. चे १२ वर्षांत १६५ रु.

१ जून, १९५७ पासून ७ वर्षें व १२ वर्षें मुदतीच्या नॅशनल सेव्हिंग्ज व नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस ह्यांची विक्री बंद करण्यांत येईल व १२ वर्षें मुदतीच्या नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकेटसची विक्री सुरू होईल.

ह्या नव्या सर्टिफिकेटांवर ५·४% व्याज सुटेल. चक्रवाढ व्याज ४·२५% करमाफ पडेल. म्हणजे, आज १०० रुपये गुंतवले, तर त्यांचे १२ वर्षांनीं १६५ रुपये होतील. सध्यांच्या सर्टिफिकिटांत ते १५० रुपये होत असत. मुदतीपूर्वी सर्टिफिकिटांचे पैसे मिळूं शकतील. (५ वर्षांनीं ११६ रु., ७ वर्षांनीं १२७ रु. व १० वर्षांनीं १४८ रु.) खरेदीच्या दिवसापासून एका वर्षानंतर सर्टिफिकिटे केव्हांहि वटवून घेतां येतील; सध्यांच्या सर्टिफिकेटांचे बाबतींत ही मुदत १८ महिन्यांची होती.

---

## हिंदी चित्रपटांची पाकिस्तानांत आयात

भारतांतून १० हिंदी चित्रपटांची आयात करण्यास पाकिस्तान सरकारनें मंजुरी दिली आहे. त्यासाठीं चीफ कंट्रोलर ऑफ इंपोर्टसनें अर्ज मागावले आहेत. पाकिस्तान सरकारच्या ह्या धोरणाविरुद्ध पाकिस्तानी चित्रपट निर्मात्यांच्या संघानें, सरकारकडे तक्रार केली आहे. सध्यांच्या पाकिस्तानी धोरणाप्रमाणें, जेवढे पाकिस्तानी चित्रपट भारतांत आणले जातात, तितक्याच हिंदी चित्रपटांची पाकिस्तानांत आयात करण्यास परवानगी मिळते.

## मजूर मंत्र्याचा महसूल मंत्र्याशीं विवाह

केरळ मंत्रिमंडळांतील मजूर मंत्रि श्री. टी. व्ही. टॉमस (कॅथॉलिक) ह्यांचा त्याच मंत्रिमंडळांतील महसूल मंत्रि कु. के. आर. गौरी (हिंदु) ह्यांच्याशीं ३० मे रोजीं विवाह होणार आहे. वधूच्या घरीं विवाहसमारंभ साजरा होईल. वधू व वर हे दोघेहि कम्युनिस्ट कार्यकर्ते आहेत. मंत्रिमंडळांत एकत्र आल्यानंतर ५५ दिवसांनीं ते पति–पत्नी होतील. मंत्रि म्हणून ते दोघेहि पूर्ववत् काम करतील.

---

## सहकारविषयक मासिकांच्या संपादकांची परिषद

भारतांतील सहकारी मासिकांच्या संपादकांची परिषद ३१ मे व १ जून रोजीं दिल्ली येथें भरणार आहे. ऑल इंडिया को–ऑपरेटिव्ह युनियननें ह्या परिषदेची योजना केली आहे व तिचें उद्घाटन मध्यवर्ती सहकार मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख हे करतील. मद्रास जर्नल ऑफ को–ऑपरेशनचे संपादक डॉ. पी. नटेसन हे अध्यक्षस्थान स्वीकारतील. भारतांत सहकारविषयक ४१ मासिकें प्रसिद्ध होतात, त्या सर्वांचे संपादक परिषदेला उपस्थित होतील, अशी अपेक्षा आहे.

---

## कंपनी कायद्यांत दुरुस्ती

१९५६ च्या कंपनी कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यासाठी भारत सरकारनें एक कमिटी नेमली आहे. कमिटीला कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या १५ जूनपूर्वी कराव्या.

---

**विदर्भ मिल्सचे श्री. देशमुख जिनीव्हाला जाणार—** आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेचें ४० वें अधिवेशन ५ जून ते २७ जून जिनीव्हा येथें भरणार आहे त्याला उपस्थित होणाऱ्या हिंदी मंडळांत कारखानदारांच्या गटाचे सल्लागार म्हणून विदर्भ मिल्स, एलिचपुरचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आर. व्ही. देशमुख, ह्यांचा समावेश आहे.

**निरक्षरांच्या संख्येंत वाढ—** उत्तर प्रदेश सरकारनें राज्यांतील शिक्षणप्रसाराची तपासणी करण्याचें काम हातीं घेतलें होतें. ह्या तपासणीनंतर करण्यांत आलेल्या अहवालावर चर्चा करतांना तपासणी अधिकाऱ्यानें असें मत व्यक्त केलें कीं, राज्यांतील निरक्षर लोकांची संख्या वाढत आहे; कारण एकूण लोकसंख्येंत वाढ होत आहे व त्यामानानें शिक्षणाच्या सोयी वाढत नाहींत.

**अणु बॉम्बच्या स्फोटाची संख्या—** अण्वस्त्रांच्या स्फोटाबद्दल माहिती सांगतांना भारताचे संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन लोकसभेंत म्हणाले कीं, युद्ध संपल्यापासून आतांपर्यंत सुमारें ११० अण्वस्त्रांचा स्फोट करण्यांत आला आहे. सर्व जगाचा नाश करण्याइतकीं अण्वस्त्रें रशिआ व अमेरिका ह्यांच्या जवळ आहेत असेंहि त्यांनीं सांगितलें.

**बचतीची उतरती किंमत—** १९४३ सालीं एका गृहस्थानें १०० रुपयांचीं १२ वर्षें मुदतीचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस घेतलीं. मुदत भरल्यावर त्याला रीतसर १५० रुपये मिळाले. ह्या पैशानें तो नवें मनगटी घड्याळ घेण्यास गेला असतां ज्या घड्याळाची किंमत १९४३ सालीं शंभराच्या आसपास होती त्याचीच किंमत २०० च्या घरांत गेल्याचें त्याला आढळून आलें.

## भारत सरकारचें अंदाजपत्रक

| उत्पन्न | | (आंकडे लक्ष रु.) | |
|---|---|---|---|
| | बजेट १९५६-५७ | दुरुस्त बजेट १९५६-५७ | बजेट १९५७-५८ |
| कस्टम ... | १५०,०० | १७१,०० | १६२,०० + ६,००* |
| एक्साइज ... | १७०,३५ | १८८,७३ | २०९,४३ +४९,००* |
| कॉर्पोरेशन टॅक्स ... | ४८,२४ | ४८,२४ | ५०,५० +४,२५* |
| उत्पन्नावरील कर, कॉर्पोरेशन टॅक्स वगळून ... | ८६,३५ | ८२,६१ | ८५,९६ +२,७५* |
| एस्टेट ड्यूटी ... | १८ | ११ | ९ |
| संपत्तीवरील कर ... | ... | ... | १५,००* |
| अफू ... | २,१० | २,२४ | २,५० |
| व्याज ... | ५,४९ | ५,२४ | ४,९० |
| मुलकी कारभार ... | ११,०६ | १५,४९ | ४३,२१ |
| चलन व टांकसाळ ... | २३,६७ | २४,४८ | ३६,०२ |
| मुलकी कामें ... | २,३९ | २,७० | २,९५ |
| इतर उत्पन्न ... | १९,३९ | १९,३२ | २७,६५ |
| पोस्ट व तार ... | १,६० | ५,३० | ३,०९ + ८५* |
| रेल्वेज ... | ६,५७ | ६,०३ | ६,६७ |
| एकूण उत्पन्न ... | ५२७,३९ | ५७१,४९ | ६३४,९७ +७७,८५* |
| **खर्च** | | | |
| उत्पन्नावरील प्रत्यक्ष बोजा ... | ३७,१५ | ३७,९२ | ४१,८० |
| इरिगेशन ... | ५ | ८ | १० |
| कर्जविषयक बाबी ... | ३५,५० | ३८,२१ | ३५,०० |
| मुलकी कारभार ... | १३५,९१ | १३३,६४ | १९१,०२ |
| चलन व टांकसाळ ... | ५,७६ | ५,०२ | ६,७२ |
| मुलकी कामें ... | १५,९१ | १४,५४ | १५,९३ |
| पेन्शनें ... | ८,८४ | ८,९८ | ९,१७ |
| निर्वासितांवरील कर | २१,४२ | २१,८६ | २२,५० |
| इतर खर्च ... | ३०,२३ | २८,३२ | ४४,०५ |
| राज्यांना ग्रँटस् ... | ३८,०० | २९,६० | २५,२३ |
| विशेष बाबी ... | १४,७० | १२,४३ | २३,८६ |
| संरक्षण खातें ... | २०३,९७ | २०२,९५ | २५२,७१ |
| एकूण खर्च ... | ५४५,४३ | ५३३,५५ | ६६८,०९ |
| बाकाया (+) तूट (−) ... | (−)१८,०४ | (+)३७,९४ | (−) ३३,१२ (+) ७७,८५* |

* नवीन करवाढ धरून

### सराफ परिचय-ग्रंथाचा प्रकाशन-समारंभ

श्री. कृ. गो. सरडे ह्यांनीं परिश्रमपूर्वक संपादित केलेल्या सराफ परिचय-ग्रंथाचा प्रकाशन समारंभ सोमवार, दि. २७ मे, १९५७ रोजीं कराड अर्बन को. बँकेच्या सभागृहांत श्री. ग. स. आळतेकर, एम्. ए., एलएल. बी. ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. प्रस्तुत ग्रंथांत सराफी धंद्याचा पूर्वेतिहास देण्यांत आला असून व्यावसायिकांना मार्गदर्शन करण्यांत आलें आहे. विशाल मुंबई व कर्नाटक विभागांतील शेंकडों नामवंत सराफांचा परिचयहि त्यांत करून देण्यांत आला आहे. पुस्तकास श्री. शं. वा. किर्लोस्कर ह्यांची प्रस्तावना आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१–३–५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



**दि सांगली बँक लि.**

**सांगली.**

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

### इन्कमटॅक्सचे नवे दर

( सरचार्ज त्यांत मिळवावयाचा आहे. त्याचे दर येथें दिलेले नाहींत. )

(१) विवाहिताला आणि अविभक्त हिंदु कुटुंबास

| | | |
|---|---|---|
| (१) एकूण उत्पन्नाचे पहिले | ३,००० रु. | कर नाहीं |
| (२) त्यापुढील | २,००० रु. | ३% |
| (३) त्यापुढील | २,५०० रु. | ६% |
| (४) त्यापुढील | २,५०० रु. | ९% |
| (५) त्यापुढील | २,५०० रु. | ११% |
| (६) त्यापुढील | २,५०० रु. | १४% |
| (७) त्यापुढील | ५,००० रु. | १८% |
| (८) त्यापुढील सर्व उत्पन्न | रु. | २५% |

(२) अविवाहिताला, न नोंदलेल्या फर्मला, इ.

| | | |
|---|---|---|
| (१) पहिले | १,००० रु. | कर नाहीं |
| (२) त्यापुढील | ४,००० रु. | ३% |
| (३) त्यापुढील | २,५०० रु. | ६% |
| (४) त्यापुढील | २,५०० रु. | ९% |
| (५) त्यापुढील | २,५०० रु. | ११% |
| (६) त्यापुढील | २,५०० रु. | १४% |
| (७) त्यापुढील | ५,००० रु. | १८% |
| (८) त्यापुढील सर्व उत्पन्न | रु. | २५% |

---

### इंडिअन रोडस् कॉंग्रेसचें अधिवेशन

शिलॉंग येथें इंडिअन रोडस् कॉंग्रेसचें अधिवेशन श्री. पी. एल. वर्मा ह्यांचा अध्यक्षतेखाली भरलें होतें. श्री. वर्मा आपल्या भाषणांत म्हणाले कीं, पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतामधील रस्त्यांची लांबी ३,१६,६६८ मैल होती. त्यांपैकी एक तृतीआंश लांबीचे रस्ते पक्क्या खडीचे होते. 'नागपूर कार्यक्रम' ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या रस्ते-बांधणीच्या योजनेंत ३,३१,००० मैल लांबीच्या रस्त्यांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. ह्या प्रश्नाकडे आर्थिक दृष्टीनें पाहूं लागलों तर असें दिसतें कीं, गेल्या दहा वर्षांत रस्त्यांच्या विकासाच्या कार्यासाठी सुमारें २०० कोटी रुपये रक्कम खर्ची पडली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रस्त्यांच्या बांधणीसाठी २६० कोटी रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या रकमेंत मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं करावयाच्या खर्चाचा समावेश झालेला आहे. इतकी रक्कम हाताशीं असल्यावर नागपूर कार्यक्रमांतील उद्दिष्ट साध्य करणें फारसें जड जाऊं नये. गेल्या कांहीं वर्षांत रस्ते बांधण्याच्या बाबतींत खेडेगांवांतील लोकांचें सहकार्य व श्रम-साहाय्य मिळूं लागलें आहे. त्यामुळें खेडेगांवाला जाणारे रस्ते कमी खर्चांत करणें शक्य होऊं लागलें आहे. समाज विकास योजना ज्या ठिकाणीं चालू आहेत अशा भागांतून अशा रीतीनें रस्ते करणें सुलभ जातें. तथापि, ह्या ठिकाणींहि रस्त्यासाठी जमीन मिळविणें अवघड जातें. पंजाबमध्यें ह्या अडचणीला यशस्वीपणें तोंड देण्यांत आलें आहे. खेडेगांवांतील लोकांच्या जमिनीचें प्रथम एकीकरण करण्यांत येतें आणि त्या जमिनींतून रस्त्यासाठी जागा घेण्यांत येते.

---

### स्टर्लिंग शिलका

भारताची स्टर्लिंग शिलक ३ मे, १९५७ रोजीं ४९६ कोटी रुपये होती. मे, १९५६ पासून ही शिलक दरमहा २४ कोटी रुपयांनीं कमी होत आली आहे.





**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**भोर स्टेट बँक लि.**
[ स्थापना : १९४४ ]
मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.
शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७८,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. चंदुके. |

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

## निवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन प्रायव्हेट लि.

मद्रास राज्याच्या दक्षिण अर्कोट जिल्ह्यांतील निवेली येथील लिग्नाइट सांठ्याच्या पहिल्या खाणींतील माती काढण्याच्या कामास दि. २० मे रोजीं पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें प्रारंभ झाला. दक्षिण भारतांतील औद्योगिक विकासासाठी लागणारी वीज, शेतकी विकासास लागणारीं खतें व घरगुती आणि औद्योगिक जळण म्हणून लागणाऱ्या लिग्नाइटच्या विटांचे (ब्रिकेटस) यांच्या निर्मितीसाठी ६८.९ कोटी रुपये खर्चाची एक प्रचंड स्वरूपाची विविध कार्यकारी योजना आंखण्यांत आलेली आहे. त्याच योजनेसाठी निवेली लिग्नाइट सांठ्यांचा उपयोग करून घेण्याची योजना मोडते.

खत कारखान्याचा खर्च वगळून लिग्नाइट योजनेसाठी ४६.९० कोटी रुपये खर्च लागेल. त्यापैकी ३१ कोटी रुपये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खर्च होतील. खत कारखान्यास ९१ कोटी रुपये लागतील. १९५७–६१ या मुदतींत तो बांधून होईल.

निवेली येथील लिग्नाइटच्या खोदकामाचें स्वरूप सोपें व साधें नव्हतें, म्हणूनच तज्ज्ञांची मदत घेण्याचें ठरविण्यांत आलें. लंडन येथील मे. पॉवेल डफेरिन टेक्निकल सर्व्हिसेस लि. या कंपनीशीं ९ मे रोजीं करार करण्यांत आला. या कामास लागणारी यंत्रसामुग्री पश्चिम जर्मनीमधील फर्मकडून मागविण्यांत आली असून त्यापैकी खास स्वरूपाच्या सामुग्रीचा पहिला हप्ता १९५८ मध्यें येईल; सदर सामुग्रीसाठी ५.५ कोटी रुपये यावे लागतील. परंतु वेळ मोडूं नये म्हणून खोदणीच्या नित्याच्या यंत्रसामुग्रीनें कामास प्रारंभ करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे.

या योजनेचें प्रचंड स्वरूप व महत्त्व आणि तेथें कार्यक्षम व लवचिक व्यवस्था असावी या गोष्टी लक्षांत घेऊन सरकारनें निवेली लिग्नाइट कॉर्पोरेशन प्रायव्हेट लि. नांवाच्या कंपनींत या योजनेचें रूपांतर केलें आहे. १०० टक्के शेअर सरकारचे आहेत. १४ नोव्हेंबर, १९५६ रोजीं मद्रास येथें ती नोंदविण्यांत आली. या कंपनीचें भांडवल २५ कोटी रुपये आहे. कंपनीच्या कामास ६ डिसेंबर, १९५६ रोजीं प्रारंभ झाला. या कंपनीच्या डायरेक्टर मंडळावर १० जण असून त्यापैकी ६ भारत सरकारचे अधिकारी, २ मद्रास सरकारचे अधिकारी, १ बिनसरकारी सदस्य व १ सेवानिवृत्त सरकारी अधिकारी आहे. श्री. टी. एम्. एस. मणी हे कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### एम. पी. ना फुकट विमान–प्रवास

दूरच्या ठिकाणाहून दिल्लीला जाण्या-येण्याला तीन दिवस लागतात. तेव्हां, पार्लमेंटच्या सभासदांना विमानानें फुकट येतां-जातां यावें, अशी कायद्यांत तरतूद करणारें बिल श्री. एन. केशव (कूर्ग-म्हैसूर) ह्यांनीं लोकसभेंत मांडलें आहे. फुकट विमान–प्रवासामुळें सभासदांना आपलें काम अधिक चांगलें करतां येईल, अशी अपेक्षा आहे.

---

### इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या पैशांचीं गुंतवणूक

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या फंडाची किफायतशीर गुंतवणूक करण्यासाठी एका स्वतंत्र मंडळाची योजना करण्यांत येणार आहे. त्यामुळें, कॉर्पोरेशनला सर्व लक्ष विम्याच्या प्रसाराकडे देण्यास वाव मिळेल.


स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोवळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, (ऑ. ट्रेझरर)
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ,,
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ,,
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ,,
श्री. मनोहर रामजी नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.



हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.